आधुनिक शहरातील घडामोडी
e Paper
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
वर्ष 4थे
संपर्क : 8999948968 शुक्रवार दिनांक02/01/2026 METRO CITY VRUTANT
www.metrocityvrutant.in पिंपरी चिंचवड व पुणे || पान 01 || अंक || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# प्रभाग 17 मध्ये तीन प्रमुख

# उमेदवारांचा झंझावाती जनसंपर्क

## प्रश्न, विकास आणि नेतृत्वाभोवती फिरतेय निवडणुकीचे रणांगण





दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी–चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १७ मधील ब गट ओबीसी आरक्षित जागेसाठी यंदा अत्यंत चुरशीची आणि लक्षवेधी लढत रंगताना दिसत आहे. प्रमुख तीन राजकीय पक्षांचे उमेदवार मैदानात उतरल्याने या प्रभागात निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापले असून, जनसंपर्क मोहिमांना वेग आला आहे.**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून शुभम वाल्हेकर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून भाऊसाहेब भोईर, तर भारतीय जनता पक्षाकडून नामदेव ढाके हे तिघेही उमेदवार आपापल्या ताकदीने प्रचारात आघाडी घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

शिवसेनेचे उमेदवार शुभम वाल्हेकर हे तरुण नेतृत्व, संघटन कौशल्य आणि आधुनिक प्रचार पद्धतीमुळे चर्चेत आहेत. युवकांशी थेट संवाद, सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि स्थानिक प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडत त्यांनी सकारात्मक वातावरण निर्माण केले आहे. कार्यकर्त्यांमधील उत्साह आणि नागरिकांकडून मिळणारा प्रतिसाद पाहता त्यांचा प्रचार दिवसेंदिवस अधिक वेग घेताना दिसतो आहे.राष्ट्रवादी काँग्रेसचे भाऊसाहेब भोईर हे अनुभवी,संयमी आणि जनसंपर्कात पारंगत नेते म्हणून ओळखले जातात. सामाजिक उपक्रमांमधील सक्रिय सहभाग, संघटनाशी दीर्घकाळाची नाळ आणि प्रभागातील प्रश्नांची सखोल जाण यामुळे ज्येष्ठ मतदारांमध्ये त्यांचा विशेष प्रभाव आहे. विकासाच्या मुद्द्यांवर ठोस मांडणी करत शांत, समतोल पद्धतीने सुरू असलेला त्यांचा प्रचार ही त्यांच्या लढतीची मोठी जमेची बाजू ठरत आहे.

भाजपचे उमेदवार नामदेव ढाके यांनीही प्रचारयंत्रणा पूर्ण ताकदीने कार्यान्वित केली आहे. पक्षाची मजबूत कॅडर, बूथस्तरावर प्रभावी नियोजन, घराघरांत जाऊन संवाद आणि पायाभूत विकासाच्या मुद्द्यांवर दिला जाणारा भर यामुळे त्यांनी आपला जनाधार अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध प्रचारशैलीमुळे त्यांच्या मोहिमेकडेही विशेष लक्ष वेधले जात आहे.

आता प्रभागातील राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची व रोचक बनली आहेत.एकूणच प्रभाग क्रमांक १७ मध्ये विकास, नेतृत्व, अनुभव आणि जनसंवाद या मुद्द्यांभोवती निवडणूक फिरताना दिसत असून, सर्वच उमेदवारांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. १५ जानेवारी रोजी मतदार कोणाच्या पारड्यात कौल देणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.